# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २२/०९/२००३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सोमवार दिनांक २२/०९/२००३ रोजी सभा सुचना क्र. १६ दि. १५/०९/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन म. पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन म. पाटील | सभापती |
| २) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ३) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ५) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| ६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ८) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ९) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १०) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ११) | श्री. नितीन गो. ठाकूर | सदस्य |
| १२) | श्री. मॉरस रॉड्रीक्स | सदस्य |
| १३) | श्री. हॅरल बोर्जीस | सदस्य |
| १४) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १५) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |
| १६) | श्रीम. रिटा शहा | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरुवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४० चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

या ठिकाणी स्थायी समिती सभापतीकरिता ज्या सदस्यांनी नावे दिली आहेत. ती नावे सचिवांनी वाचली आहेत. त्या नावांपैकी जर कुणाला आपले नाव मागे घ्यायचे आहे त्यांना पाच मिनिटांचा कालावधी देण्यात येत आहे. या वेळेत त्या सदस्यांनी आपले नाव मागे घ्यायचे आहे.

**रिटा शहा :-**

महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस पार्टीचे अध्यक्ष मा. श्री. रणजीत देशमुख साहेब, गृहमंत्री श्री. कृपाशंकर सिंग साहेब, माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेब, श्री. शंकर पिटला साहेब ह्या वरिष्ठांचे आदेशाचे पालन करुन आणि पार्टीच्या निती नियमानुसार आमच्या पार्टीच्या वरीष्ठांच्या आदेशानुसार व आमचे सहकारी श्री. मॉरस रॉड्रीक्स ह्यांना आमच्या पार्टीने उमेदवारी दिली आहे आणि त्यांना पाठिंबा देऊन मी माझे उमेदवारी पत्र मागे घेत आहे. त्याचबरोबर मी येथे आपल्यासमोर बसली आहे आणि माझे जे आज करिअर आहे ते त्यांच्यामुळेच आहे असे प्रथम माजी नगराध्यक्ष श्री. गिल्बर्ट मेंन्डोसा साहेब ह्यांनी देखील

मला कनव्हेंन्स केले की, पार्टीचा आदेश मानायला पाहिजे. त्यांचेही नाव आपण नमुद करावे अशी माझी सूचना आहे.

**आसिफ शेख :-**

अंतिम यादी उमेदवारांची जाहिर केली त्याच्यात जी सुचक आणि अनुमोदन आहेत. त्यांची नावे वाचण्यात यावी.

(प्र. सचिवांनी सुचक व अनुमोदन यांच्या नावाचे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

ह्या ठिकाणी सन्मा. सदस्या रिटा शहा यांचा अर्ज मागे घेण्यात आला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापन झाल्यापासुन सर्व सदस्यांच्या सहकार्याने मिरा भाईंदर शहराच्या विकासाच्या दृष्टिकोनातुन, अधिका-यांचे व सदस्यांचे चांगले सहकार्य लाभले होते. मिरा भाईंदर पहिली अशी महानगरपालिका आहे की, ज्या महानगरपालिकेमध्ये कॉंग्रेस पक्ष व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष ह्यांची युती होऊन निवडणुक झाली आणि त्यांच्या सहकार्याने एलेन्समध्ये सत्ता स्थापन होऊन राष्ट्रवादी कॉंग्रसेच्या मा. मायरा मेंन्डोसा व कॉंग्रेस पक्षाचे मा. मुझफ्फर हुसैन यांच्या अधिपत्याखाली मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापन होऊन एक वर्षभराचा काळ लोटलेला आहे. पार्टीच्या आदेशानुसार आणि ठरलेल्या कंडीशनप्रमाणे आज ह्या ठिकाणी जो मी फॉर्म भरलेला आहे तो आमच्या पार्टीचे सर्व मा. राज्यस्तरीय पदाधिकारी व ह्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आदरणीय नेते प्रथम नगराध्यक्ष श्री. गिल्बर्ट मेंन्डोसा ह्यांच्या मार्गदर्शनाखाली जो प्रशासनामध्ये अत्यंत सुरेख कारभार चालू आहे आणि त्यांनी सांगितल्याप्रमाणे पार्टीच्या आदेशानुसार आणि त्यांच्या मार्गदर्शनाच्या अधिपत्याखाली सुरळीत कारभार चालला पाहिजे व दोन्ही पार्टीनी एकत्रित येऊन मिरा भाईंदरच्या तमाम जनतेला सुव्यवस्था देऊन कामे झाली पाहिजे. अशी जी आत्मियता आहे त्या आत्मियतेच्या अनुषंगाने मी माझा उमेदवारी अर्ज मागे घेत आहे.

(एकुण चार उमेदवारी अर्जापैकी दोन उमेदवारी अर्ज १) रिटा शहा २) मोहन पाटील ह्यांचे अर्ज मागे घेण्यात आले व दोन उमेदवारी अर्ज शिल्लक राहिले.)

**आसिफ शेख :-**

आजच्या सभेचे विद्यमान पिठासीन अधिकारी मा. श्री. मोहन पाटील, मा. उपआयुक्त केळकर साो., उपआयुक्त नाईक साो., व मा. उपआयुक्त पाणपट्टे साो. आणि सचिव साो., सर्व उपस्थित माझे सहकारी स्थायी समिती सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग, व बंधु भगिनींनो ज्याप्रमाणे विद्यमान सभापती साहेब ह्यांनी सांगितले राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी आणि कॉंग्रेस पक्ष हे दोन्ही एकत्रितपणे समान कार्यक्रमाच्या अंतर्गत या शहराच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रितपणे येऊन निवडणूक लढविली होती. आणि त्यानंतर सर्वांना बरोबर घेऊन सर्व पक्षांना बरोबर घेऊन आम्ही ह्या ठिकाणी वर्षभरात जी विकासाची कामे केलेली आहेत ती खरोखरच श्री. मोहन पाटील ह्यांच्या वर्षभरातील कारकीर्दीचा जेवढा गुणगौरव करता येईल तेवढा फार कमी आहे असे मी समजतो. कारण वर्षभरातील त्यांच्या कारकीर्दीतील त्यांनी सर्व पक्षाच्या लोकांना, सर्व गटनेत्यांना आणि सर्व सदस्यांना, सर्व अधिकारी वर्गांना बरोबर घेऊन कोणाचीही नाराजी न बाळगता अत्यंत चांगले आणि उत्कृष्ठ असे कामे केलेले आहे व त्यांची वर्षभरातील कामगिरी वाखाणण्याजोगी आहे. त्यांनी वर्षभर जेवढे काम केले त्या कामाचे जेवढे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे. त्यांनी ह्याठिकाणी आपल्या फार अत्यंत मोठ्या मनाने जी कमीटमेन्ट केलेले आहे. शेवटी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची भूमिका राहिलेली आहे की, स्वाभिमानाने जगायचे स्वदेशी मानाने जगायचे आणि जी कमीटमेन्ट दिलेली आहे ती कमिटमेन्ट पाळायची. शेवटी समयबद्धता निवडणूक चिन्ह घड्याळ आहे. आणि नियमाप्रमाणे चालायचे आणि दिलेला शब्द पाळायचा. तो शब्द आम्ही ह्या ठिकाणी पाळलेला आहे. आणि आमच्या दोन्ही पक्षातील नेते मंडळी तसेच स्थानिक आमचे गॉडफादर प्रथम नगराध्यक्ष गिल्बर्ट मेंन्डोसा साहेब ह्यांच्या सहकार्याने सर्वांगीण विकासाकरिता आपल्या सर्वांचे सहकार्य ह्याठिकाणी लाभले आहे. तसेच आदरणीय सभापती मोहन पाटील ह्यांनी जे वर्षभरात कार्य केले त्याबद्दल त्यांना पुन्हा एकदा धन्यवाद देतो आणि नेते मंडळी आणि स्थानिक आमचे गॉडफादर प्रथम नगराध्यक्ष मा. गिल्बेट मेंन्डोसा साो. यांच्या सहकार्याने सर्वांगीण विकासाकरिता आपले सर्वांचे सहकार्य याठिकाणी लाभलेले आहे. आदरणीय विद्यमान सभापती मोहनजी पाटील यांनी जे वर्षभर काम केले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो आणि आम्ही जे कमिटमेन्ट केले आहे ते कमिटमेन्ट आम्ही ह्या ठिकाणी पूर्ण केलेले आहे. त्याबद्दल पुन्हा एकदा धन्यवाद देऊन जे कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार आहेत त्यांना ह्या ठिकाणी पाठिंबा जाहिर करुन शुभेच्छा देतोय. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**चंद्रकांत वैती :-**

मा. सभापती सो., मा. उपआयुक्त सो., सर्व स्थायी समिती सदस्य आज ह्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापतींच्या निवडणुकीत काँग्रेस पक्ष आणि राष्ट्रवादी युतीचे उमेदवार मा. मॉरस रॉड्रीक्स सो. हे अधिकृत उमेदवार आहेत. ह्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रांत अध्यक्ष मा. आर. आर. पाटील सो., काँग्रेस पक्षाचे प्रांत अध्यक्ष मा. रणजीत देशमुख सो., ह्या लोकांच्या मार्गदर्शनाखाली मा. ऑबजरवर श्री. वसंत डावखरे सो. आणि मा. श्री. शंकर पिटला साहेब ह्यांच्या नेतृत्त्वाखाली आजचे हे अधिकृत उमेदवार घोषित करण्यात आले आहे. आणि आमचे मिरा भाईंदर स्थायी समितीचे सहकारी श्री. शरद पाटील ह्यांनी ही अर्ज भरलेला आहे. मिरा भाईंदर शहर अध्यक्ष ह्यांनी सांगितले की, आम्हाला निवडणुक घ्यायची आहे. पण त्यांना पुनःश्च विनंती करतोय की, आपण ह्या खेळीमेळीच्या वातावरणात आपला अर्ज मागे घ्यावा. अशी काँग्रेस पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने विनंती करतोय.

**आसिफ शेख :-**

श्री. धनराजजी अग्रवाल ह्यांनी सांगितल्याप्रमाणे निवडणूक प्रक्रिया सुरु करण्यात यावी.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीजी ह्यांनी आपली सूचना ह्या ठिकाणी मांडली व धनराज अग्रवालजी ह्यांनी ही ह्या ठिकाणी आपली मते व्यक्त केलेली आहे. शहराचे काम करत असताना मागच्या वर्षभराच्या कामकाजाने मी एवढे सांगु इच्छितो की, कोणताही इश्यु पक्षाच्यावर गेलेला आणि त्याच्यावर काय निर्णय झालेला आहे असे माझ्या माहितीप्रमाणे या सभागृहात झालेले नाही आहे. एखाद्या विशिष्ट परिस्थितीमध्ये आपण आपल्या भूमिका ह्याठिकाणी ठेवत असतो. परंतू सर्व सन्मा. सदस्यांनी आपल्या पक्षाचे झेंडे बाजूला ठेवून शहराच्या विकासाचा झेंडा याठिकाणी चांगल्या पद्धतीने रोवलेला आहे. आणि सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल व रिटा शहा ह्यांनी आपआपले मत येथे व्यक्त केले आहे. ती आपली वैयक्तिक मत आहेत. परंतू नव्याने रिटाजी आल्या आणि आपले जुने ह्याठिकाणचे सहकारी धनराजजी अग्रवालजी ह्यांनी ह्याठिकाणी कोणत्याही पद्धतीने पक्षाच्या अंतर्गत उमेदवारी मांडलेली नाही. आपण पक्षाच्या बाबतीत काही गोष्टी आपण ह्या ठिकाणी केल्यात. त्या संसदीय कामकाजातुन काढुन टाकावेत. आणि लोकशाहीच्या पद्धतीने याठिकाणी उमेदवारी अर्ज जे शरद पाटील आणि मॉरस रॉड्रीक्स ह्यांचा राहिलेला आहे. मी प्रशासनाला येथे सांगू इच्छितो की, आपण याठिकाणी निवडणूकीची प्रक्रिया सुरु करावी. आणि निवडणुकीची प्रक्रिया ही अर्धा तास राहील.

(ठिक दु. १२.२० मि. निवडणुक प्रक्रियेला सुरुवात केली.)

**आसिफ शेख :-**

अध्यक्ष महोदय, आपण निवडणुक प्रक्रिया सुरु केली आहे आणि काही सदस्य हे सभागृहाच्या बाहेर गेले आहेत. निवडणुक प्रक्रिया सुरु झाल्यानंतर कोणत्याही सदस्याने बाहेर जाता कामा नये असे संकेत पाळले पाहिजेत. तसेच मला एक सूचना मांडायची आहे.

**मा. सभापती :-**

सूचना आता मांडू नका. ते इतिवृत्तांतात येणार नाही. कारण आता निवडणुकीची प्रक्रिया सुरु आहे.

**आसिफ शेख :-**

अध्यक्ष महोदय, वाट पाहण्याची गरजच नाही. अधिकृत उमेदवार म्हणुन श्री. मॉरस रॉड्रीक्स ह्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने पाठिंबा दर्शविला आहे. आमचे दहा लोकांचे समर्थन ह्यांना आहे. भाजपाने अर्ज मागे घेतलेला नाही. पण तरीही येथे मतदानाची आवश्यकता दिसत नाही. आपण ओपन मतदान करा.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवालजींनी विनंती केली आहे, की आपण मनाचा मोठेपणा दाखवा व एक पॉलीनिटी मतदान करावे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख आणि सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती ह्यांनी बोलले ओपन मतदान करावे व त्यांनी ओपन मतदानाची मागणी केली आहे. धनराजजी अग्रवाल आपले ह्याबाबत काय मत आहे.

**शरद पाटील :-**

आमच्या पक्षाचे अध्यक्ष जे बोलतील ते मला मान्य आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मतदानाची प्रक्रिया चालू असताना कोणताही सदस्य असे कसे बोलतात.

**मा. सभापती :-**

सदस्यांनी येथे ओपन मतदानाविषयी मुद्दा मांडला मतदान करु नये असे बोलले नाही. आपले ओपन मतदानाविषयी काय मत आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आपण नियमाप्रमाणे करा.

**मा. सभापती :-**

जर उमेदवारांचा आक्षेप नसेल तर मतदान ओपन होऊ शकते. आणि उमेदवाराचा जर आक्षेप असेल तर ओपन मतदान होणार नाही.

**धनराज अग्रवाल :-**

नियमात असेल तर आपण ओपन मतदान करा.

(प्र. सचिवांनी निवडणुक मतपत्रिकेतील सूचनांचे वाचन केले.)

**मा. केळकर सो. (उपआयुक्त) :-**

निवडणुक मतपत्रिकेच्या मागे ज्या सूचना दिल्या आहेत त्याचे काटेकोर वाचन करावे व त्यानंतरच सदस्यांनी मतदान करावे. सचिवांनी निवडणुक पत्रिकेचे वाचन करुन झाल्यावरच मतदानाच्या प्रक्रियेला सुरुवात करतोय. मतदान कक्षामध्ये लाल पेन्सिल ठेवण्यात आली आहे. व त्याच लाल पेन्सिलने फूली करायची आहे.

**प्र. सचिव :-**

मतपेटी रिकामी दाखविण्यात येत आहे. जर कोणत्याही सदस्याला रिकामी पेटी बघायची असेल तर त्यांनी येऊन बघावे.

(रिकाम्या मतपेटीला सर्व सदस्यांसमोर कुलुप लावून सदरची चावी मा. पिठासीन अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आली व मतदानाला दु. १२.४५ मि. सुरुवात करण्यात आली.)

(मा. सभापती यांनी नियम पुन्हा वाचून दाखविले व सचिवांना आदेश दिला की नावे वाचून मतदान प्रक्रियेला सुरुवात करावी.)

**प्र. सचिव :-**

मतपेटीत आपले मत पिठासीन अधिकारी यांच्या समक्ष टाकायचे आहे.

(निवडणुक मतदान प्रक्रिया दुपारी ठिक १२.४५ ला सुरुवात होऊन दु. १.०० वा. संपली. त्यानंतर मतदानपेटी उपस्थित सदस्यांच्या समक्ष उघडण्यात आली. मतपेटीतील मतपत्रिका मोजण्यात आल्या व एकूण सोळा मतपत्रिका असल्याचे प्र. सचिवांनी सांगितले. उमेदवारांना मिळालेल्या मतांची मा. केळकर सो. गणती केली असता श्री. मॉरस रॉड्रीक्स ह्यांना १३ मते व श्री. शरद पाटील ह्यांना ३ मते पडली असल्याचे निश्चित झाले.)

**मा. सभापती (श्री.मोहन पाटील) :-**

याठिकाणी मतदान प्रक्रिया पूर्ण झाली आहे व श्री. शरद पाटील ह्यांना ३ मते पडली असुन श्री. मॉरस रॉड्रीक्स ह्यांना १३ मते पडली आहेत. व त्यांना ह्याठिकाणी विजयी घोषित करत आहे व मी त्यांना स्थायी समिती सभापतीचा पदभार देत आहे.

**प्रकरण क्र. १४० :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम २१(१) अन्वये **''सभापती''** स्थायी समिती या पदावर नेमणुक करणेकरिता

**ठराव क्र. ११७ :-**

प्रकरण क्रमांक १४० पाहता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २००३-२००४ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणूक करावयाची आहे.

या नेमणूकीसाठी नामनिर्देशन पत्र मागविली असतां,

१) श्री. पाटील मोहन मधुकर
२) श्री. पाटील शरद केशव
३) श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ
४) श्रीम. शाह रिटा सुभाष

यांनी त्यांची नामनिर्देशनपत्रे दाखल केली.

वरील चार उमेदवारांपैकी दोन उमेदवार १) श्री. मोहन मधुकर पाटील २) श्रीम. रिटा सुभाष शहा यांनी आज दिनांक २२/०९/२००३ रोजी स्थायी समितीच्या सभेत निवडणुक प्रक्रियेस सुरुवात होणे अगोदर आपली उमेदवारी मागे घेतल्याने दोन उमेदवार १) श्री. शरद केशव पाटील २) श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ हे शिल्लक राहिले आहेत. त्याकरिता सभापती, स्थायी समिती या पदाकरिता मतदांन घेण्यांत आले.

त्यावेळी १) श्री. शरद केशव पाटील यांना ०३ इतकी मते आणि २) श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ यांना १३ इतकी मते मिळाली. पैकी श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ यांना सर्वाधिक मते मिळाली असून ते विजयी झालेले आहेत.

तरी श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ यांची सन २००३-०४ सालाकरीता सभापती, स्थायी समिती या पदाकरिता मतदानाद्वारे निवड झाल्याचे मी जाहिर करीत आहे.

**ठराव मतदानाद्वारे मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(श्री. मोहन पाटील ह्यांनी श्री. मॉरस रॉड्रीक्स ह्यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.)

**मा. केळकर सो. :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे नवनिर्वाचित सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स ह्यांचे प्रशासनामार्फत स्वागत करतो व त्यांना नेहमी सहकार्य करण्याचे अभिवादन प्रशासनातर्फे करतो.

**मा. मोहन पाटील (सभापती) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या एक वर्षकालाच्या नंतर ह्या निवडणूकीमध्ये श्री. मॉरस रॉड्रीक्स, राष्ट्रवादी कॉंग्रेस व कॉंग्रेस पक्ष युतीचे सभासद सदस्य म्हणून सभापती या पदावर त्यांना राष्ट्रवादी यांच्या पाठिंब्याने ह्या ठिकाणी ते निवडुन आले आहे. मी माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना सदिच्छा व्यक्त करतो. आणि ह्या सभागृहाच्या कामकाजामध्ये आपल्या बरोबर राहून शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून आपणांस सहकार्य राहिल असे मी माझ्या सदस्यांच्या वतीने सांगू इच्छितो. गेल्या वर्षभराच्या कालावधीमध्ये या सभागृहामध्ये सर्व सन्मा. सदस्यांनी खेळीमेळीच्या वातावरणामध्ये जे मला सहकार्य दिले आणि त्या सहकार्याने या शहराचा विकास करण्यामध्ये जो प्रशासनाने व सर्व सदस्यांनी जो हातभार लावला आणि कोणतीही बाब ह्या ठिकाणी तात्विक मतभेदावर आल्यानंतर विकास हाच फक्त एकच ध्यास ह्या नगरसेवकांचा ह्या ठिकाणी राहिलेला आहे आणि तो ध्यास पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून सर्व सन्मा. सदस्यांनी मला जे सहकार्य केले आणि ते सहकार्य करत असताना जर कुठुन चुकुन दोन शब्द जास्त गेले असतील ते शब्द आपण सांभाळुन घेतले आणि यापूढेही घ्याल अशी अपेक्षा आपल्याकडुन मी करत आहे आणि यापूढेही नवनिर्वाचित सभापती आपल्या समोर आहे व त्यांना ही आपले चांगले सहकार्य लाभेल अशी मी अपेक्षा आपल्याकडुन या ठिकाणी करत आहे. त्याप्रमाणे प्रशासनाने वेळच्या वेळी आलेल्या प्रस्तावाला सभागृहाने दिलेला प्रस्ताव हा प्रस्ताव आपला प्रस्ताव आहे आणि शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनाचे आहे असे समजून सन्मा. सदस्यांनी त्यांना ज्या सूचना दिल्या व काही बाबतीमध्ये त्यांच्याशी हितगुज केले खालच्या आवाजामध्ये, वरच्या आवाजामध्ये पटणारी न पटणारी हितगुज झाली आणि प्रशासनाने मोठ्या दिलाने मोठ्या मनाने हितगुज स्विकारली, सूचना स्विकारल्या आणि कुठेही कामाच्या बाबतीत कसुरता दाखविली नाही की, सन्मा. सदस्यांनी मला जे बोललेले आहे ती वाक्य कोणत्या पद्धतीची आहेत त्याच्यापेक्षा त्याच्यापाठी जो विकासाचा ध्यास आहे असे समजून त्यांना जे सहकार्य केले आणि या शहरामध्ये विकासाच्या दृष्टिकोनातुन टप्प्याटप्प्याने जो विकास घडविला आहे तो विकास घडविण्यामध्ये आपला सिंहाचा वाटा आहे व तो यापुढेही राहिल अशी अपेक्षा मी येथे व्यक्त करतो. आणि यापुढेही आपण या विकास कामामध्ये कोणत्याही बाबतीमध्ये कमीपणा न दाखविता सदस्यांनी कोणतीही बाब आपल्यासमोर प्रकट केली त्यात कमीपणा न दाखविता गेल्या वर्षभर आपण ज्याप्रकारे सहकार्य केले. काही बाबतीमध्ये प्रशासनाला कायद्यामध्ये काही कामे बसवायची होती. कायद्यामध्ये जो प्रांतिक कायदा आहे त्यात काही अडचणी येतात. प्रत्येक बाबतीमध्ये त्या वाक्याचा उल्लेख न करता प्रांतिकच्या कायद्याचा उल्लेख न करता आपण ज्या पद्धतीने सहकार्य केले कायद्यात बसवून आणि वेळोवेळी प्रशासनाच्यावतीने तत्कालिन आयुक्त आणि आताचे उपआयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक सो. यांचे चांगले सहकार्य यापुढेही आपल्याला मिळेल.

कायद्याच्या काही बाबी आपल्याला आढळल्या त्यांनी ते कायद्यात कोणत्या पद्धतीने बसायला पाहिजे त्यांनी त्यापद्धतीने ते काम कायद्यामध्ये बसविले आणि ते बसविताना प्रशासनाला एक पाऊल मागे टाकावे लागेल अशी कोणतीही भूमिका त्यांनी स्विकारलेली नाही आणि श्री. कल्याण केळकर सा़े. मुख्याधिकारी असताना ह्या ठिकाणी त्यांनी सुत्रे सांभाळली होती. त्यांचा पुर्वानुभव आणि ह्या ठिकाणी उपआयुक्त म्हणुन त्यांनी आमच्याबरोबर राहुन जे कामाच्या बाबतीत आम्हाला सहकार्य केले हसतखेळत. कारण कोणताही राग करायचा असेल तर हसून राग केला पाहिजे आणि कोणतेही प्रेम करायचे असेल तर हसून प्रेम करायला पाहिजे. अशा आपल्या स्वभावात बदल न करता आपण सहकार्य केले आणि प्रशासनाला माझ्याकडुन जे काही दोन शब्द उच्च आवाजामध्ये सभापती पदावर असताना रुलिंगमध्ये एखादा शब्द कमी जास्त झाला असेल तर माझे सहकारी जे अधिकारी आहेत मी आपल्याबरोबर ज्या पद्धतीने राहिलो व राहण्याचा प्रयत्न केला त्याला आपण चांगल्या पद्धतीने प्रतिसाद दिला. त्याबद्दल मी आपल्याला येथे धन्यवाद देतो. आणि ह्या मिरा भाईंदरच्या विकासाचे यश आहे ते अशा पद्धतीने आपण संपादन करुन या मिरा भाईंदरचे नाव या महाराष्ट्रामध्ये केले पाहिजे. कोणताही सदस्य आपल्याला कोणत्याही पद्धतीने बोलला तर त्याच्यापाठीमागे पार्श्वभूमी ही विकासाची असेल. तर आपला मोठेपण हा नेहमी आम्हाला कामाला आलेला आहे. आणि सर्व अधिकारी वर्गाला, प्रशासनाला मी हार्दिक धन्यवाद देतो की आपण आम्हाला जे सहकार्य केले त्याच्याबद्दल आणि ह्यापुढे आपले सहकार्य आम्हाला मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करुन ज्या सभापतीच्या कार्यक्रमामध्ये आपण ज्यांनी ज्यांनी मला सहकार्य केले त्यांना सर्वांना धन्यवाद देऊन श्री. मॉरस रॉड्रीक्स ह्यांना एवढेच सांगेन की, आपला जो अधिकारी वर्ग आहे ह्या अधिकारी वर्गामध्ये त्यांनी आपला कधी कमीपणा किंवा काम न करण्याची भूमिका त्यांच्या मनामध्ये कधीही नसते. परंतु कायद्यामध्ये काही बाबी, अडचणी येत असतील तर त्या अडचणी ते आपल्यासमोर आणू इच्छितात आणि त्यांनी आणलेल्या अडचणीवर प्रकर्षाने आपण प्रकाश टाका आणि ह्यांच्याकडुन आपण काम करण्याच्या पद्धतीप्रमाणे काम करुन घेण्याची पद्धती अवलंबा तरच आपल्या या ठिकाणी शहराच्या विकासाचे यश मिळेल. आणि खेळीमेळीच्या वातावरणामध्ये आपले जे सहकारी नगरसेवक आहेत ते कोणत्या पक्षाचे असण्यापेक्षा कोणत्या बाबतीत ते प्रस्ताव मांडताहेत, त्यांचे विकासकामे कोणती आहेत असा जो त्यांचा ध्यास आहे. त्याप्रमाणे आपण त्यांना सहकार्य करावे तेही आपल्याला जरूर सहकार्य करतील. अशी सदिच्छा व्यक्त करुन या मिरा भाईंदरच्या कार्यकाळामध्ये ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांना पुनःश्च धन्यवाद देऊन मी माझी येथे रजा घेतो. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**चंद्रकांत वैती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आजच्या या स्थायी समितीच्या निवडणुकीमध्ये कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस युतीचे उमेदवार मा. मॉरस रॉड्रीक्स साहेब हे सभापती पदी विराजमान झाले त्यांचे कॉंग्रेस पक्षातर्फे आणि युतीतर्फे हार्दिक स्वागत करतो. माजी सभापती मोहन पाटील साहेब ह्यांनी अत्यंत चाणाक्षपणे स्थायी समितीचा कारभार चालविला आणि काही ठिकाणी कठोर निर्णय सुद्धा घेतले व त्यांची अंमलबजावणी ह्याच्यापुढे नवनिर्वाचित सभापती मा. मॉरस रॉड्रीक्स साहेब ह्यांच्याकडुन होईल. धन्यवाद.

**धनराज अग्रवाल :-**

सबसे पहिले मैं मा. मॉरस रॉड्रीक्स नवनिर्वाचित सभापती उनका अभिनंदन करता हुँ। शहर के विकास के लिए भले हम विरोधी पक्ष मे हो लेकिन विकास के लिए हमारा, हमारे पार्टी का हमेशा सहयोग रहा है। पिछले साल जैसा निवृत्त सभापती मोहनजीने बताया की, कुछ विषय खाली ऐसे थे, जो हमको नही पटे और हमने उसका विरोध जरुर किया। लेकिन विरोध करनेका मतलब यह नहीं की, हमारा आपस में कोईभी बहुत बडा दुश्मनी हुआ, और बडे मन से सभापतीने लिआ मैं उनको भी धन्यवाद देता हुँ। आगे भी कुछ चीजे ऐसी है, कुछ हमारे प्रस्ताव भी रहेंगे प्रस्ताव सिर्फ शहर के विकास के लिए ही रहेंगे। लेकिन विरोधी पक्ष से वो प्रस्ताव लेने का नही ऐसी भुमिका न रखेंगे ऐसी मैं आशा रखता हुँ। और आपको हमारा हमेशा विकास के लिए सहकार्य रहेगा। धन्यवाद.

**मिलन म्हात्रे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर द्वितीय वर्षाचे स्थायी समिती सभागृहाचे सभापती म्हणुन श्री. मॉरस रॉड्रीक्स आपली आम्ही सर्वांनी निवड केलेली आहे. आजच्या निवडीबरोबर या शहरातील लाखोंच्या संख्येत जी जनता आहे. त्याचे नेतृत्त्व आपल्याला एकप्रकारे दुय्यम स्तरावर मिळालेले आहे. हे नेतृत्त्व करत असताना आपण सर्व सभासदांचे म्हणणे ऐकुन घ्याल कारण आता आपण कुठल्या पक्षाचे राहिलेले नाही, तर या शहराचे राहिलेले आहात. व सर्व नगरसेवकांचे प्रतिनिधी

म्हणुन आपण आता यापुढे काम कराल आणि यापुढे आपल्याला ते काम करायचे आहे. मघाशी माझे मित्र श्री. वैती साहेब बोलले की निर्णय हे खेळीमेळीने व त्याचे इम्प्लीमेंटेशन हे कधीही खेळीमेळीने होत नसते. ते कठोरपणानेच होत असते. तरच काम पूर्ण होते. पण यापूढे जो निर्णय घ्यायचा आहे त्याच्यानंतर त्याची जी पूर्तता आहे ती आपण कठोरपणानेच घेतली पाहिजे. तर भविष्यातील जे आपले वर्ष आहे ते चांगले जाईल. या शहरामध्ये अनेक मोठमोठे काही प्रकल्प कार्यान्वित व्हायचे आहे, काही अर्धवट अवस्थेत आहेत, काही परिपूर्ण व्हायचे आहे. या सर्व प्रोजेक्टना जो काही विलंब लागलेला आहे ते काम लवकर व्हायला पाहिजे, अशी मनोकामना पाहिजे. शहरामध्ये आपण सर्वत्र खात्यामध्ये आर्थिक वाढ केलेली आहे. त्यामुळे जो नागरिक आपल्याला वाढीव पैसा देणार आहे, तर या शहरासाठी आपण काय करतोय त्याचा हिशोबसुद्धा तो नागरिक मागणार आहे. ह्याची आपण जाण ठेवुन येणाऱ्या वर्षात आपली चांगली कारकींद राहिल अशी मी माझी स्वतःची इच्छा भाईंदर जनता दल सेक्युलर या पक्षातर्फे मांडतोय. तसेच, आपण निधर्मी पक्षाचे उमेदवार होता म्हणून मी ही माझे सहकार्य केलेले आहे. यापुढे चांगल्या कामास आमचे आपल्याला जरूर पाठिंबा आणि सहकार्य राहिल. व जिथे विरोध असेल तिथे मोकळेपणाने आम्ही विरोध दर्शवू. एवढे बोलून मी माझे भाषण समाप्त करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**अशोक पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे दुसरे सभापती म्हणुन मान मिळविणारे आजचे सभापती साहेब सन्मा. कॉंग्रेसचे अधिकृत उमेदवार श्री. मॉरस रॉड्रीक्स साहेब ह्यांनी बहुमताने आज ही सभापती पदाची निवडणुक जिंकलेली आहे. आपणा सर्वांचे वतीने त्यांचे अभिनंदन करतो. नगरपरिषद असताना त्यांना दोन वर्षे सभापती पदाचा अनुभव त्यांच्या पाठिशी आहे. असे अनुभवी सभापती आज या स्थायी समितीत जी महानगरपालिकेची एक महत्त्वाची स्थायी समिती आहे. त्याची जाणीव असेल आणि त्या हिशोबाने ही महत्त्वाची समिती असल्याकारणाने या शहराच्या विकासाच्या दृष्टीने जे महत्त्वाचे निर्णय घेतले जातात. ते या स्थायी समिती मार्फत घेतले जातात आणि आम्हा सर्वांचे वतीने त्यांना तसे शहराच्या विकासासाठी सहकार्य राहिल असे मी शहर विकास आघाडीचा अध्यक्ष म्हणुन मी त्यांना शुभेच्छा आणि पाठिंबा व्यक्त करतो. मागील वर्षात जे सभापती होते श्री. मोहन पाटील ह्यांनी या शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातुन भरपूर निर्णय घेतले त्याची अंमलबजावणी केली व त्यात जर काही त्रुटी, उणिवा राहिल्या असतील तर त्याची भर आताचे श्री. मॉरस रॉड्रीक्स साहेब ह्यांनी पूर्ण कराव्यात. आणि या शहराच्या विकासाचा महत्त्वाचा वाटा उचलावा अशा शुभेच्छा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**अनंत पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे दुसरे सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स त्याचप्रमाणे मावळते स्थायी समितीचे अध्यक्ष श्री. मोहनजी पाटील. आता आपल्या ह्या एक वर्षाच्या कालावधीमध्ये मोहन पाटील ह्यांनी ज्या ज्या विकास कामांना प्राधान्य देऊन आपली कामे पूर्ण केलेली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. त्याचबरोबर श्री. मॉरसजी रॉड्रीक्स मिरा भाईंदर विभागातील जनतेच्या कल्याणासाठी, जनतेच्या कामासाठी अधिक तऱ्हेने आणि चाणक्षपणे लक्ष देऊन विकासाला हातभार लागेल अशी मी अपेक्षा करुन शिवसेना पार्टीतर्फे त्यांचे हार्दिक स्वागत करतो.

**मा. शिवमुर्ती नाईक सो. (उपआयुक्त) :-**

मा. नवनिर्वाचित सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स, माजी सभापती श्री. मोहन पाटील आणि मान्यवर स्थायी समिती सदस्य आणि माझे अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग, बंधु आणि भगिनींनो, आपल्याला माहिती असेल. मोहन पाटीलजीना ही कल्पना होती की, काम केले तरच चुका घडतात व काम केलेच नाही तर चुका घडणार नाही. मागील वर्षामध्ये काम करत असताना कर्मचाऱ्यांकडुन, प्रशासनाकडुन काही किरकोळ चुका झाल्या असतील तर ते पदरात घालुन नगरपालिकेचा विकास, नगरपालिकेच्या हद्दीत करणेच्या या ध्येय भावनेने प्रशासनाला सर्व सभासदांनी आणि सभापती श्री. मोहन पाटील ह्यांनी सहकार्य केल्याबद्दलच प्रशासनाने मान्यवर सभासद यांच्या संमतीने विकास कार्य घडु शकले. माजी सभापतींनी जसे धडाडीने काम केले त्याचपद्धतीने आपणही धडाडीने काम करावे. प्रशासन आपल्याला कायम चांगल्या स्वरुपाचे सहकार्य करेल. आपल्या या कार्यास माझ्या व प्रशासनाच्या हार्दिक शुभेच्छा.

**मा. कल्याण केळकर सो. (उपआयुक्त मुख्यालय) :-**

नवनिर्वाचित सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स ह्यांना ह्यापुर्वी नगरपरिषद प्रशासनाचा सभापती पदाचा त्यांनी ह्यापुर्वी सुद्धा विषय समितीचे सभापती म्हणुन बांधकाम समितीवर ते अनेक वर्ष सभापती होते. आणि त्यांना नगरपरिषद प्रशासन कामाचा अनुभव आहे. त्यांना मी महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने माझ्या

सर्व कर्मचारी बंधु-भगिनींच्या वतीने मी त्यांना आश्वासन देऊ इच्छितो की, ह्यापूर्वी सारखेच सहकार्य त्यांना महानगरपालिका प्रशासनातर्फे राहिल. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**मा. सभापती (श्री. मॉरस रॉड्रीक्स) :-**

सर्व प्रथम मी आमच्या युतीचे कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नगरसेवकांना व कॉंग्रेसचे श्री. मुझफ्फर हुसैन सो., राष्ट्रवादी कॉंग्रेसचे श्री. गिल्बर्ट मेंन्डोसा सो. ह्यांच्या सहकार्याने मी सभापती झालो आणि तसेच आमचे निरीक्षक पिटला साहेब, देशमुख साहेब ह्यांच्यातर्फेही मला चांगले सहकार्य मिळाले व त्याचप्रमाणे मा. श्रीम. मायरा मेंन्डोसा सो. ह्यांचे सहकार्य मिळाल्याबद्दल त्यांना मी ह्याठिकाणी सर्वप्रथम धन्यवाद देतो. तसेच प्रशासनातर्फे उपस्थित श्री. केळकर सो., श्री. नाईक सो., माजी सभापती श्री. मोहन पाटील आणि स्थायी समिती सदस्यांना मी येथे धन्यवाद देतो. आणि येथे उपस्थित असलेले अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग ह्यांना ही धन्यवाद देतो. आता मागील वर्षी जसे कामकाज केले त्याप्रमाणे सभागृहात खेळीमेळीचे वातावरण ठेवून व त्यात कुठलेही राजकारण न बाळगता मी सर्व कामे इथे चांगल्या पद्धतीने पार पाडेन अशी सदिच्छा व्यक्त करतो. धन्यवाद.

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा येथे संपल्याचे मी जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०१.३० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**